# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ७९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/१२/२०१७

**१) कामाचे ठिकाणी ठेवलेल्या सामानाची चोरी. :–**

दिनांक ०१/१२/२०१७ चे १७.३० वाजता ते ०२/१२/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान फिर्यादी खुशाल हरीचंद्र फेन्डर वय ३८ वर्ष, रा. शहापुर ता. जि. भंडारा हा कारपेन्टर असुन ब्रॉस सिटी टाकळी भंडारा येथील खोलीत मशिन कामाचे ठिकाणी ठेवलेली एक अॅक्युरेट कंपनीची प्लॉय कटर मशीन कि. १५,००/रु एक एक्स्ट्रा पॉवर कंपनीची ड्रिल मशीन कि. १२,००/रु, एक एक्स्ट्रा पावर कंपनीची ग्रेडर मशीन किमती १२,००/रु असा एकुण ३,९००/रु चा असता कोणीतरी अज्ञात चोराने खोलीचे दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक ०२/१२/२०१७ चे ११.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. पद्मा निलकंठ पुडके वय ३२ वर्ष, ही आपले राहते घरी पोटात दुखुन आल्याने तिला औषधोपचारा करीता पडोळे हॉस्पीटलमध्ये भंडारा येथे भरती केले ति उपचारा दरम्यान ११.३० मरण पावल्याचे फिर्यादी महेन्द्र गोवर्धन शेन्डे वय २८ वर्ष, रा. माडगी ता. तुमसर जि. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) शेतातील धानाचा पुजंना जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/१२/२०१७ चे ०७.०० वाजता पुर्वी यातील आरोपीने फिर्यादीस मला शेतीतुन हिस्सा दिला नाही म्हणुन त्याने फिर्यादीचे शेतीतील सव्वा एकर शेत जमीनीतील धानाचा रचुन ठेवलेला पुजंना जाळुन नुकसान केल्याने फिर्यादी हरीदास नारायण तिखार वय ६५ वर्ष, रा. कोझुरली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४३५,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास नापोशी. राहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/१२/२०१७ चे २०.०० वाजता ते २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कार्तीकलाल महादेव राहागडाले वय ५७ वर्ष, रा.हरदोली हा त्याचे घरी हजर असतांना आरोपीतांनी फिर्यादीचे घरासमोर असलेले मांडवा जवळ शेकोटी करीत तणस पेटविले असता, फिर्यादीने आरोपीतांना हटकले असता तु हटकणारा कोण असे बोलुन आरोपी क्र. १ ने व आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे दोन्ही पायावर काठीने मारपीट करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी. :–**

दिनांक ०२/१२/२०१७ चे ११.०० वाजता यातील फिर्यादी शिशुपाल राजकुमार शरणागत वय २३ रा. सिंधपुरी याचा काकेभाऊ जखमी नामे चैतन्य संजय शरणागत वय ७ वर्ष, रा. सिंधपुरी हा किराणा दुकाणावर सामान आणण्या कामी गेला असता, यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील वाहण भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन त्यास धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७ भादवी.सहकलम १३४(ब), १८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**६) भिंतीला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/१२/२०१७ चे १२.०० वाजता यातील आरोपी याने त्याचे ताब्यातील चार चाकी वाहन पिकप क्रमांक एमएच ३६/३२०७ हे हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे घराचे समोरील भिंतीला (वॉल कंपाउड) ला धडक दिल्याने भिंत तोडुन किमती. १०,०००/रु चे नुकसान करून पडुन गेल्याने, फिर्यादी अशोक भिवाजी खरवाडे वय ५० वर्ष रा. सिल्लेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,४२७ भादवी. सहकलम १३४ १८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बोरकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**७) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक जखमी :–**

दिनांक ०२/१२/२०१७ चे १८.३० वाजता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन रनेराकडे जाणारा सायकरलस्वार सुखलाल चिंतामण पारधी वय ६५ वर्ष रा. रनेरा यांच्या सायकलला धडक मारून गंभिर जखमी केले, व मोटार सायकलवर बसलेला इसम तोसीम अखील शेख वय २३ वर्ष रा. सिहोरा यास जखमी करून स्वत:च्या मरणास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी जाधव यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७,३३८ ३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जटाळ पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**८) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०२/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, साकोली, पवनी व लाखांदुर येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० हा.भ.दारू किंमती १,०००/–रु. व १५ लिटर ३०० मिलीलीटर देशी दारू + सडवा मोहा किमती ४,८००/–रु. असा एकुण किंमती ५,८००/रु चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०४ तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व ईतर वाहनांवरती ८७ केसेस करण्यात आलेले आहे.

PI 3/12/17

( पो.नी. एस. बि कदम )
**नियत्रण कक्ष अधीकारी भंडारा**
**दुरध्वनी क्र.७०२११८८१८५५**

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.